# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३५४१**

**अपिलार्थी श्री. संजय दत्ताराम कोदे**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त**
सांताक्रुझ विभाग, जुहू गार्डन, सांताक्रुझ (प), मुंबई- ४०० ०५४

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-९)**
हिलरोड, बांद्रा (पश्चिम), मुंबई- ५०.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०४.०३.२०२६**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १६.०४.२०२४ | ०७.०६.२०२४/३१.०८.२०२४ | १७.०५.२०२४ | ०१.०८.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०९.१२.२०२४ रोजीच्या अर्जान्वये विहित वेळेत माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०७.०६.२०२४, ३१.०८.२०२४ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. ०१.०८.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १६.०६.२०२४ रोजीच्या माहिती अर्जानुसार दि. ०९.०४.२०२३ व २७.०५.२०२३ रोजी केलेल्या अर्जांवर करण्यात आलेली कार्यवाहीची माहिती विचारली होती. जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०६.२०२४ रोजी अपिलार्थीना माहिती उपलब्ध करुन दिली. अपिलार्थीचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. १७.०५..२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०८.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना मुद्दा क्र. ३ संबंधीत माहिती पुरवावी. तसेच बाकीच्या मुद्यांची माहिती अपिलार्थीस ह्या आधी पुरविलेली आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर दि.३१.०८.२०२४ रोजी अधिकची माहिती उपलब्ध करुन दिली.

३. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन दि. ०२.०३.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थीना दि. ०७.०६.२०२४ रोजी माहिती पुरविलेली आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर अधिकची माहिती अपिलार्थीना दि. ३१.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे.

..२/-

४. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०७.०६.२०२४ सह त्यांना दि. २२.०६.२०२१ रोजीचे पत्राची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली होती. सदर पत्रात नमुद केले होते की, सदर तक्रार अर्जाच्या अनुशंगाने चौकशी अधिकारी पोउनि बंडगर यांनी सदर तकारीच्या अनुषंगाने आपला जबाव नोंद केला असता तसेच आपण सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन आले की, सदरची वादग्रस्त जागा ही गैरअर्जदार वापरत होते तेथे त्यांची दुधाची डेअरी होती. सदरची डेअरीचा ढाचा बी.एम.सी ने निष्कासित केली आहे. गैरअर्जदार यांनी त्या विरोधात मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असुन सदरचे प्रकरण पहिले अपिल नंबर ८५९८/२०२१ प्रमाणे पेंडीग आहे. तरी सदरची याचिका ही मा. न्यायालयात न्यायप्रविष्ट असल्याने सदर प्रकरणाची पोलीस ठाणेकडील चौकशी न्यायालयाच्या निर्णयास अधिन राहुन सदर तक्रारीबाबत पुढील योग्य ती कारवाई करण्याची तजवीज ठेवण्यात आलेली आहे.

५. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही व सदर पत्रात दिलेली माहिती खोटी आहे.

६. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी वस्तुस्थिती सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल.

जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणाच्या वस्तुस्थितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. १७.०३.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**मुंबई**
**दिनांक : ०४.०३.२०२६**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००३५४१**
**अपिलार्थी श्री. संजय दत्ताराम कोदे**

## सुनावणी दिनांक : १७.०३.२०२६ (In continuation of order dt ०४.०३.२०२६)

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी मागील सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही व सदर पत्रात दिलेली माहिती खोटी आहे. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणी वस्तुस्थिती सादर करण्यासाठी वेळेची मागणी केली. त्यांची मागणी मान्य करण्यात येत आहे. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. जन माहिती अधिकारी यांनी सदर प्रकरणाच्या वस्तुस्थितीसह पुढील सुनावणीस उपस्थित रहावे असे आदेशित केले होते.

२. आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी एका इसमाविरुध्द पार्किंगच्या कारणाने तक्रार केली होती. त्यांनी संबंधित सोसायटीचे रहिवाशी व अपिलार्थी यांचे सर्वांचे जबाब घेतले. परंतु अपिलार्थी त्या ठिकाणी राहत नाही. तपासाअंती सर्व घेतलेल्या जबाबावरुन अपिलार्थी यांनी केलेली तक्रार कलम ३४१ अन्वये गुन्हा होत नाही व सदर प्रकरणी न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे असे विरुध्द पक्षाचे म्हणणे होते.

३. अपिलार्थी यांनी आयोगास सादर केले की, नागरिकांची सनद प्रमाणे तक्रार केली त्याची नोंद घेऊन त्यावर दखलपत्रात्र गुन्हा व अदखलपात्र गुन्हा दाखल करणेबाबत मागणी होती.

४. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, अपिलार्थींच्या तक्रारीवर तपासाअंती त्यांना सदर प्रकरणी गुन्हा होत नाही असे निदर्शनास आल्याने तसे अपिलार्थी यांना स्पष्ट कळविले आहे.

५. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना माहिती दिलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

### आदेश

**अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai
सत्यमेव जयते

18-3-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १८.०३.२०२६**